स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिकशास्त्रे विद्याशाखेतील 'लोकप्रशासन' विषयाच्या विद्यावाचस्पती

पदवीकरिता सादर केलेला शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधन विषयाचे नाव :

"संसद आदर्श ग्राम योजना" एक प्रशासकीय अभ्यास

(विशेष संदर्भ मराठवाडा विभाग)

"Saansad Adarsh Gram Yojana An Administration Study"

(Special Reference to Marathwada Region.)

-: संशोधक :-

प्रा. अशोक बालाजी आळणे

एम. ए. लोकप्रशासन सेट, नेट

-: मार्गदर्शक :-

प्रा. डॉ. बाजीराव वडवळे

संशोधन मार्गदर्शक व

लोकप्रशासन विभाग प्रमुख

पीपल्स कॉलेज, नांदेड

ऑगस्ट - २०१७

" संसद आदर्श ग्राम योजना" एक प्रशासकीय अभ्यास.

(विशेष संदर्भ मराठवाडा विभाग)

"Saansad Adarsh Gram Yojana" An Administration Study"
(Special Reference to Marathwada Region.)

प्रस्तावना :-

जेव्हा मनुष्य पृथ्वी तलावर वास्तव्य करुन राहत होता. तेंव्हा तो टोळ्यात राहत होता. या टोळ्याचा प्रमुख त्या टोळीतील एक श्रेष्ठ व्यक्ती प्रमुख असत त्या दृष्टीकोनातून भारतात प्राचीन काळ, ऋग्वेद काळ, उत्तर वैदिक काळ, महाकाव्य काळ, बौध्द काळ, मौर्यकाळ, गुप्त काळ, राजपुत काळ, सलतनत काळ, मुघलकाळ, ब्रिटिश इत्यादी काळात ग्राम ही संकल्पना उल्लेखीत आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण विकासाच्या दृष्टीने सामूदायिक विकास प्रकल्प, बलवंतराय मेहता समिती, वसंतराव नाईक समिती, मेहता समिती इत्यादी समित्यांनी ग्राम विकास करण्याच्या दृष्टीकोणातून प्रयत्न केले. या समित्यांचा उद्देश ग्रामीण विकास करणे होता १९९३-९४ च्या ७३ व्या घटनादुरुस्ती संदर्भातील कलम - २४३ अ ते २४३ - ओ यात ग्रामीण विकासा संदर्भात महत्वाच्या तरतूदी करण्यात आले आहेत. स्थानिक संस्थांना भारतात घटनात्मक दर्जा देण्यात आला आहे. भारताच्या आधुनिक काळात ग्रामीण विकासाच्या दृष्टीने अनेक योजना राबविल्या जातात. यात रोजगार हमी योजना, पंतप्रधान आवास योजना स्वच्छ भारत अभियान तसेच "संसद आदर्श ग्राम योजना" या योजनेद्वारे गावाचा विकास प्रभावीपणे केला जातो.

ग्राम विकास ही संकल्पना सर्वप्रथम महात्मा गांधी यांनी 'हरिजन' या त्यांच्या पुस्तकात मांडली यात ग्राम स्वराज्य संकल्पना मांडतांना त्यांनी गाव हे स्वयंमपूर्ण असले पाहीजे तसेच गावातील नागरिकांनीच आपल्या साधन संपत्तीद्वारे विकास केला पाहिजे ही त्यांची धारणा होती याचाच आधार घेऊन आधुनिक माहिती व तंत्रज्ञानाच्या काळात गुजरात-पुनसारी, तेलंगणा-अन्कापुर, केरळ-कुंभलर्गी तसेच महाराष्ट्रातील हिवरे बाजार, राळेगणसिंधी हे गावे आदर्श ग्राम म्हणून विकसीत झालेली आहेत. गांधीजीची ग्राम स्वराज्य या संकल्पनेस डोळ्यासमोर ठेवून नरेंद्र मोदी यांनी ११ ऑक्टोबर २०१४ रोजी "संसद आदर्श ग्राम योजनाची" सुरुवात केली. या

योजनेचा मुख्य उद्देश ग्रामीण भागाचा मानवी निर्देशांक वाढवून त्यांना विकासाच्या प्रवाहात आणने हा होय आहे. "संसद आदर्श ग्राम योजना" ही लोकसभेतील खासदार व राज्य सभेतील खासदार हे आपल्या मतदार संघातून एक गाव निवडून त्याचा परिपूर्ण विकास करतील हा उद्देश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आहे. संसद आदर्श ग्राम योजना राबविण्याची प्रमुख जबाबदार खासदार, ग्रामीण विकास मंत्री, राज्य मुख्य सचिव, जिल्हाधिकारी तसेच ग्रामपंचायतीवर आहे. प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने मराठवाड्यातील नांदेड, हिंगोली, परभणी व जालना या जिल्ह्यातील संसद आदर्श ग्राम योजना संदर्भातील सुक्ष्म बाबी व या योजनेची फलश्रृती अभ्यासने प्रस्तुत संशोधनाच्या दृष्टीने महत्वाचे आहे.

संसद आदर्श ग्राम योजना :-

१) दत्तक घेतलेल्या गावाचा विकास करुन जनतेचा दर्जा उंचावणे, जनतेला विकासाच्या प्रवाहात आणने या उद्देशाने प्रेरित संसद आदर्श ग्राम योजना आहे.

२) "संसद आदर्श ग्राम योजना" ही गावाचा सर्वांगिण अंगाने विकास करणारी योजना होय.

साहित्य पुर्नविलोकन :-

संशोधन करतांना संदर्भ साहित्याचा आढावा घेणे क्रम प्राप्त ठरते. साहित्यातून मिळालेले निष्कर्ष नव्या संशोधन कार्यासाठी उपयुक्त असतात. त्यामुळे संदर्भाचा वेगवेगळा असणारा अर्थ बोध संबंधीत विषयासाठी देशा देणारा ठरतो. त्यासाठी खालील साहित्याचा आढावा घेतलेला आहे.

१) मोहनदास करमचंद गांधी :- हरिजन (१९३७ -४२) ६४ वा ७६ वा खंड

हरिजन या ग्रंथात ग्राम स्वराज्य यातील रस्ते व्यवस्था, विहीरी, दुग्ध शाळा अन्य धान्य परिपूर्णत:, मनोरंजनाची साधने मैदान व्यवस्था प्रस्तुत ग्रंथात लेखाने दिली आहे.

श्यामसुंदर वाघमारे, सुरेश गजभारे :-

महाराष्ट्रातील ग्रामीण व नागरी प्रशासन या ग्रंथात ग्रामीण प्रशासन संदर्भात विविध समित्यांच्या शिफारशींची माहिती प्रस्तुत ग्रंथात दिलेली आहे.

समस्या सुत्र :-

प्रस्तुत संशोधन संसद आदर्श गाव योजने संदर्भातील असून या योजनेचा गावातील नागरीकांना किती प्रमाणात फायदा झाला व योजने अंमलबजावणीसाठी समस्या कोणत्या उद्‌भवतात या समस्या शोधण्यासाठी प्रस्तुत संशोधनाची निवड केली आहे.

संशोधनाचे उद्दिष्टे : -

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी पुढील उदिष्ट्ये ठेवण्यात आली आहेत.

१) "संसद आदर्श ग्राम योजनेत" येणाऱ्या अडथळयाचा शोध घेणे.

२) "संसद आदर्श ग्राम योजनेत" लाभान्वित नागरिकांच्या समस्यांचा शोध घेणे.

३) "संसद आदर्श ग्राम योजनेत" संदर्भात केंद्र, राज्य, स्थानिक प्रशासनाने घेतलेल्या निर्णयाचा आढावा घेणे.

४) "संसद आदर्श ग्राम योजना" राबवितांना येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे.

५) "संसद ग्राम योजनेला" दिलेला निधी तपासणे.

६) "संसद ग्राम योजना" राबविणाऱ्या यंत्रणांचा शोध घेणे.

७) "संसद ग्राम योजने" द्वारे गावाचा विकास किती प्रमाणात झाला हे तपासणे.

संशोधन विषयाचे गृहितके : -

संशोधन कोणत्याही प्रकारचे असो, त्यात गृहितकृत्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. गृहितकृत्य हे एक असे विधान मानले जाते की जे संशोधन सुरू करण्यापूर्वी मांडले जाते. शेवटी संशोधनातून प्राप्त झालेल्या निष्कर्षाशी गृहितकृत्य जोडून पाहिजे जाते. या गृहितकृत्यांमुळेच संशोधनाला गती मिळते. तसेच संशोधनाचे यश अपयश मोजले जाते. प्रस्तुत संशोधनासाठी खालील गृहितकृत्यांचा घेण्यात येणार आहे.

१) "संसद आदर्श ग्राम योजना" मराठवाड्यात प्रभावीपणे कार्य करत आहे.

२) "संसद आदर्श ग्राम योजना" द्वारा गावाचा विकास होत आहे.

३) "संसद आदर्श ग्राम योजना" निधीची कमतरता आहे.

४) "संसद आदर्श ग्राम योजना" विविध प्रकारच्या समस्यांचा सामना करावा लागतो.

५) "संसद आदर्श ग्राम योजनेत" केंद्र शासन, राज्य शासन व स्थानिक शासन यात समन्वय आहे.

६) "संसद आदर्श ग्राम योजनेत" आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होत आहे.

७) "संसद आदर्श ग्राम योजनेत" नियुक्त करण्यात आलेल्या कमिट्या प्रभाविपणे कार्य करत आहेत.

संशोधन पध्दती : -

प्रस्तुत संशोधन कार्यात सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे. या पध्दतीद्वारे विषयासंदर्भातील वास्तविक परिस्थितीचा काय आहे याचा शोध घेतला जाणार आहे.

१) संशोधन शिर्षक :-

"संसद आदर्श ग्राम योजना" एक प्रशासकीय अभ्यास (विशेष संदर्भ मराठवाडा विभाग) **"Saansad Adarsh Gram Yojana An Administration Study"(Special Reference to Marathwada Region.)**

२) संशोधन स्वरुप :-

संशोधनाचे स्वरुप सामाजिक शास्त्र पध्दतीचे असणार आहे. या संशोधन कार्यात वर्णनात्मक व विश्लेषनात्मक अध्ययन पध्दतीचा वापर तसेच ग्रंथालयीन पध्दतीचा वापर करुन प्राथमिक व द्वितीय पध्दतीचा वापर करण्यात येईल.

३) अध्ययन क्षेत्र : -

संशोधन क्षेत्राच्या व्याप्तीच्या संदर्भात आज प्रत्येक संसद सदस्यांना एक गाव देण्यात आले आहे. ही योजना देशात चालू आहे. या योजनेचा एकाच वेळी अध्ययन करणे अशक्य आहे. प्रस्तुत संशोधन कार्यासाठी मराठवाड्यातील नांदेड, हिंगोली, परभणी व जालना जिल्ह्यातील राबविणाऱ्या यंत्रणा व कार्यरत कर्मचाऱ्यांचा तसेच लाभार्थ्यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

४) तथ्य संकलन : -

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोताचा वापर केला जाणार आहे.

अ) प्राथमिक स्त्रोत :-

तथ्य संकलनाच्या प्राथमिक स्त्रोतामध्ये प्रश्नावली, मुलाखत, अनुसूची, निरिक्षण इ. स्त्रोतांचा वापर केला जाणार आहे.

ब) दुय्यम स्त्रोत :-

प्रस्तुत विषयांच्या अनुषंगाने प्रकाशित व अप्रकाशित लिखाण अर्थसंकल्पातील माहिती, नियतकालिके, मासिके, साप्ताहिके, वर्तमानपत्र तसेच इंटरनेट या स्त्रोतांचा वापर करण्यात येणार आहे.

५) माहिती पृथःक्करण :-

माहिती पृथःक्करणात खालील मार्गाचा अवलंब करण्यात येईल.

अ) वर्णनात्मक व विश्लेषनात्मक

ब) संगणकीकरण

६) संशोधनाची उपयुक्तता :-

७३ व्या घटना दुरुस्तीद्वारे ग्रामीण भागाचा विकास झालेला दिसतो. हा विकास ज्या प्रमाणांत व्हायला पाहिजे होता तो झालेला नाही. म्हणून नरेंद्र मोदीनीं इ.स. २०१४ मध्ये संसद आदर्श ग्राम योजनेची सुरुवात केली व आज ग्रामीण भागाचा विकास या योजनेतून होत आहे. खासदारांना या योजनेसाठी निधी देण्यात येतो. या निधीची किती प्रमाणात यशस्वी अंमलबजावणी झाली याची सत्यता तपासण्यासाठी प्रस्तुत संशोधनाची उपयुक्तता आहे.

कोणतेही संशोधन कार्य समाज उपयुक्त असणे ही काळाची झाली आहे. संशोधनातून समाजात असणाऱ्या विविध वास्तविक समस्यांची उकल होत असते. संशोधन हे समाजाला योग्य दिशा देणारे असते. परिवर्तनात्मक मुख्य घटकाला चालना देणारे असते. प्रस्तुत संशोधनाची यशस्वीता "संसद आदर्श ग्राम योजना" यातील संसद सदस्य ग्राम प्रशासन, तसेच संबंधित गावातील लाभार्थी यांची महिती घेण्यासाठी हे संशोधन कार्य उपयुक्त आहे."संसद आदर्श ग्राम योजनांची" गावातील नकारात्मकता दूर करण्यासाठी व संबंधित योजनेतील विविध ध्येय धोरणे यशस्वी करण्यासाठी येणाऱ्या अडथळ्याचा शोध घेण्यासाठी प्रस्तुत संशोधन उपयुक्त ठरेल.

७) अध्ययनाच्या मर्यादा : -

१) प्रस्तुत संशोधन कार्य हे मराठवाड्यातील संसद आदर्श ग्राम योजना लाभान्वित गावापुरती मर्यादित राहील.

<u>प्रकरण योजना</u>

प्रकरण पहिले : - प्रस्तावना

प्रकरण दुसरे : - संसद आदर्श ग्राम योजनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

प्रकरण तिसरे : - संसद आदर्श ग्राम योजना स्वरुप व कार्यपध्दती

प्रकरण चौथे : - संसद आदर्श ग्राम योजनेचे संघटन

प्रकरण पाचवे : - तथ्य संकलन व विश्लेषण (मुलाखत प्रश्नावली वर आधारित)

प्रकरण सहावे : - निष्कर्ष आणि शिफारशी

संदर्भ ग्रंथ सुची

१) मोहनदास करमचंद गांधी -हरिजन (९-१-१९३७) खंड ६४ वा

२) मोहनदास करमचंद गांधी -हरिजन (२६-०७-१९४२) खंड ७६ वा

३) श्यामसुंदर वाघमारे, सुरेश गजभारे २०१२, महाराष्ट्रातील ग्रामीण व नागरी प्रशासन अरुणा प्रकाशन, लातूर

४) जनरल नॉलेज टूडे न्यू दिल्ली. चालू घडामोडी पुस्तीका जूलै २०१७

५) प्रदिप आगलावे -२०१० सामाजिक संशोधन पध्दती शास्त्र व तंत्रे (साईनाथ प्रकाशन नागपूर)

६) शर्मा विरेंद्र -२०१० रिसर्च मेथडॉलॉजी (पंचशिल प्रकाशन नागपूर)

७) भांडारकर पु.ल. -१९९८ सामाजिक संशोधन पध्दती , विद्याबुक प्रकाशन औरंगाबाद

८) विर गौतम ३ २००९ पंचायती राज व्यवस्था ओमेगा पब्लिकेशन नवी दिल्ली.

वेब साईड :-

१) http:/saanjahi.gov.in

२) http:/social justice.nic.in

वृत्तपत्रे :-

१) लोकसत्ता

२) महाराष्ट्र टाईम्स

३) सकाळ

संशोधन मार्गदर्शक **संशोधक**

प्रा. डॉ. बाजीराव वडवळे
संशोधन मार्गदर्शक व लोकप्रशासन विभाग प्रमुख
पीपल्स कॉलेज, नांदेड

प्रा.अशोक बालाजी आळणे
एम.ए. लोकप्रशासन सेट नेट